# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


====================================================================

जावक क्रमांक – ७४४/४५ दिनांक :- ११ एप्रिल, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडाचा १० वा लोकशाही दिन १५ एप्रिल रोजी

लोकशाही दिन नागरिकांसाठी प्रभावी आणि उपयुक्त उपक्रम

मुंबई, दि. ११ एप्रिल, २०२५ : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) दहावा लोकशाही दिन मंगळवार दिनांक १५ एप्रिल, २०२५ रोजी , दुपारी १२ वाजेपासून 'म्हाडा'च्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात चौथ्या मजल्यावरील सभागृहात उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येणार आहे.

म्हाडा प्रशासनातर्फे नागरिकांना कळविण्यात येत आहे की, जानेवारी-२०२४ पासून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयातील सभागृहात म्हाडा लोकशाही दिन आयोजित करण्यात येत आहे. आतापर्यंत म्हाडामध्ये नऊ लोकशाही दिनाचे यशस्वी आयोजन म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. लोकशाही दिनांतर्गत नागरिकांच्या तक्रारींवर संबंधित अधिकार्यांच्या उपस्थितीत थेट व खुली चर्चा केली जाते. यामुळे वर्षानुवर्ष प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली निघाली असून नागरिकांना सुलभ, पारदर्शक आणि त्वरित न्याय मिळत आहे. या उपक्रमामुळे म्हाडा प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी व नागरिकांप्रती संवेदनशील बनले असल्याचा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. तसेच लोकशाही दिन हा नागरिक आणि प्रशासन यांच्यातील विश्वासाचा मजबूत दुवा ठरत आहे.

म्हाडा प्रशासनाद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की आपल्या तक्रारी अथवा प्रश्न लोकशाही दिनामध्ये उपस्थित करावेत. तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/अपील्स, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे /देण्यात येणार आहे अशा प्रकरणाची पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे नसेल असे अर्ज म्हाडा लोकशाही दिनात स्वीकारले जाणार नाहीत. जे अर्ज लोकशाही दिनाकरिता स्वीकृत करता येऊ शकणार नाहीत असे अर्ज संबंधित विभागाकडे आवश्यक कारवाईसाठी आठ दिवसात पाठवण्यात यावे व त्याची प्रत अर्जदारास पृष्ठांकित करणे गरजेचे आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

Maharashtra Housing & Area Development Authority
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Phone No:- 022 66405066/77 Email : cpromhadaoffice@gmail.com

==============================================================

Outward No. : 744 /45 Dt. April 11 , 2025

Press Release

## MHADA to hold 10th Lokshahi Din on April 15 to address public grievances

Mr. Sanjeev Jaiswal, IAS, VP and CEO, MHADA, to lead the citizen grievance redressal initiative

Mumbai, 11 April, 2025 : The Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) will conduct its 10th Lokshahi Din on held on Tuesday, 15th April 2025, at 12 noon, in the 4th floor meeting hall of MHADA's headquarters at Bandra (East). The session will be led by Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer of MHADA.

MHADA administration informs the public that since January 2024, Lokshahi Din is being organized on the second Monday of every month at the Bandra (East) headquarters. So far, nine Lokshahi Din sessions have been successfully conducted under the leadership of Mr Jaiswal. During these sessions, open and direct discussions are held on citizens' complaints in the presence of concerned officials. As a result, many long-pending matters have been resolved immediately, offering citizens transparent, simple, and speedy justice.

This initiative has enhanced transparency, accountability, and responsiveness within the MHADA administration. Citizens have expressed confidence that Lokshahi Din serves as a strong bridge between the public and the administration.

The MHADA administration appeals to all citizens to present their grievances or queries during Lokshahi Din. However, please note that the following types of applications will not be accepted during Lokshahi Din: Cases that are already under judicial consideration, Matters related to revenue/appeals, Service and establishment-related issues, Applications not in the prescribed format or without required supporting documents, Matters for which a final reply has already been issued or is in process, Repeated applications on the same subject, Applications or grievances of a personal nature

Applications that are not eligible for Lokshahi Din will be forwarded to the concerned department for appropriate action within eight days. A copy of the same, with page numbering, must be provided to the applicant.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---

Follow us on :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial